MHPU170018932012

| | |
|---|---|
| दाखल तारीख | : २१/११/२०१२ |
| नोंदणी तारीख | : २१/११/२०१२ |
| निकाल तारीख | : २९/०६/२०२६ |
| कालावधी | : १३ व. ०७म. ०८ दि. |

# न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इंदापूर, जि. पुणे यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी एम. एच. फारुकी)

**नि.फौ ख. क्र. ३२६/२०१२** **निशाणी क्र. ४०**

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र सरकार द्वारा**<br>इंदापूर पोलिस स्टेशन, इंदापूर<br>ता. इंदापूर, जि. पुणे. | **.... अभियोग पक्ष** |
| **—विरुध्द—** | |
| **अनिल किसन वाघमोडे**<br>वयः ३५ वर्ष, व्यवसायः मजुरी<br>रा. कर्दनवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे. | **.... आरोपी** |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १४/११/२०११ ते १५/११/२०११ |
| पहिली खबर तारीख | १५/११/२०११ |
| दोषारोपपत्राची तारीख | २१/११/२०१२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २५/०२/२०२० |
| पुराव्याला लागल्याची तारीख | २१/०१/२०२१ |
| न्यायनिर्णयास राखीव तारीख | -------- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २९/०६/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -------- |

## आरोपींची माहिती

| आरोपीचे नाव | अटकेची | जामीनावर | गुन्हयाचे कलम | शिक्षेस | शिक्षाधिन |
|---|---|---|---|---|---|

| | तारीख | सोडल्याची तारीख | | पात्र किंवा निर्दोष | बंदीचा कालावधी UTP |
|---|---|---|---|---|---|
| अनिल किसन वाघमोडे | ०४/१२/११ | ३१/१२/११ | भा.दं.वि. कलम ४५७ व ३८० अन्वये | निर्दोष | -- |

## सरकारी साक्षीदारांची यादी

| अनु.क्र. | नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | नवनाथ शिवाजीराव पवार | २६ | फिर्यादी |
| २. | लखन शिवाजी भोसले | ३० | पंच साक्षीदार |
| ३. | विजय जगन्नाथ जाधव | ३५ | पंच साक्षीदार |

## अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २७ | फिर्याद |
| २. | २८ | फिर्यादीचे पुरवणी जबाब |
| ३. | ३१ | घटनास्थळ पंचनामा |

## बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायालयाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १६ | दोषारोप |
| २. | १७ | आरोपीचे निवेदन |

| | | |
|---|---|---|
| ३. | ३७ | आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये जबाब. |

## भौतीक वस्तू

| अनु.क्र. | साहित्य नंबर | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**आरोपः- भारतीय दंड विधानाचे कलम ४५७ व ३८० अन्वये.**

सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ता :- श्री. एम. डी. करे

बचाव तथा आरोपी पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ :- श्री. बी. पी. जगताप

## न्यायनिर्णय

## (दिनांक २९ जुन, २०२६ ला घोषित)

१. सदरची केस आरोपींच्या विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५७ व ३८० च्या गुन्हयासाठी न्यायचौकशीस आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे-**

२. दिनांक १४/११/२०११ रोजी रात्री ०९.०० ते दिनांक १५/११/२०११ रोजी सकाळी ०७.०० वाजण्याच्या सुमारास मौजे बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे येथील बावडा-वालचदंनगर रोडजवळील कै. शहजीराव पाटील कॉम्प्लेक्स पश्चिमेस असणारे ग्रामपंचायत गाळ्यातील जनता सुपर मार्केट या नावाच्या किराणा मालाचे दुकानात घटना घडली आहे. दिनांक १४/११/२०११ रोजी सकाळी ०८.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीने त्याचे किराणा दुकानात उघडून दिवसभर मालाची विक्री करुन तो रात्री ०९.०० वाजण्याच्या सुमारास दुकानाच्या दोन्ही शटरला कुलूप लावून बंद करुन घरी गेला. त्यानंतर दुस-या दिवशी दिनांक १५/११/२०११ रोजी सकाळी ०७.०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हा घरी असतांना त्याच्या दुकानाचे पाठीमागे राहणारा त्याचा सासरा शिवाजीराव फडतरे यांनी फिर्यादीस फोनद्वारे कळविले की, ''फिर्यादीचे बावडा गावात असणारे जनता मार्केट दुकान

चोरट्यांनी फोडले आहे''. त्यानंतर फिर्यादी हा त्याच्या दुकानाजवळ येवून पाहिला असता त्याचे दुकानाचे पश्चिमेकडील लोखंडी शटर हे उचकटलेले दिसले. तसेच पश्चिमेकडील लोखंडी पट्टी कुलूपातून तुटलेली दिसली. त्यामुळे फिर्यादीने त्याचे नातेवाईकांना बोलावून घेतले. त्याचे दुकानातील ड्रॉवरमधील नगद रक्कम रु.२५,०००/–, एक सोनी कंपनीचा सी.डी. प्लेअर अंदाजे किंमत रु.१,०००/–, एक एल.जी. कंपनीचा डि.व्ही.डी. रायटर अंदाजे किंमत रु.५००/–, तेलाच्या बाटल्या अंदाजे किंमत रु.१,०००/–, एक नोकीया कंपनीचा मोबाईल अंदाजे किंमत रु.१,०००/– असे एकूण रक्कम रु.२८,५००/– चा मुद्देमालाची कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरी केलेबाबत फिर्यादीने फिर्याद दिली. त्यानंतर पुन्हा फिर्यादीने पुरवणी जबाब दिले की, घटनेच्या वेळी त्याच्या दुकानातील दोन पामोलिन तेलाचे डबे अंदाजे किंमत रु.१४,००/– चे सुध्दा चोरी झालेचे कथन केले, म्हणून सदरची फिर्याद.

३. खबरीच्या आधारे इंदापूर पोलीस स्टेशन येथे अपराध क्र.३४६/२०११ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासीक अंमलदार पोलीस उपनिरीक्षक श्री. सी. एम. यादव यांनी प्रकरणाचा पुढील तपास पूर्ण करीत आरोपी विरुध्द अंतिम अहवाल या न्यायालयासमोर सादर केला.

४. माझे पूर्वाधिकारी यांनी सदर खटल्यात निशाणी क्र.१६ वर आरोपीविरूध्द दोषारोप ठेवला व आरोपीस समजावून सांगितला असता त्याने निवेदन निशाणी क्र.१७ प्रमाणे गुन्हा नाकबूल करून केस चालविण्याची विनंती केली.

५. आरोपीचे स्पष्टीकरणात्मक फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३१३(१)(ब) प्रमाणेचे निवेदन निशाणी क्र.३६ वर नोंदविण्यात आले.

६. त्यानंतर संपरिक्षेच्या शेवटच्या टप्प्यांत मी सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एम. डी. करे यांचा आणि बचाव पक्षातर्फे आरोपींचे सुविद्य विधीज्ञ श्री. पी. जी. जगताप यांचा युक्तिवाद ऐकला.

७. या संपूर्ण पार्श्वभुमीवर, माझे समोर निर्णयाकरिता पुढील विचाराधीन प्रश्न उदभवलेत. या प्रश्नांना मी, त्याखालील नमुद कारणमीमांसेच्या बळावर तसेच अभिलेखी उपलब्ध

पुराव्याचे आधारे, आज रोजी माझे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १४/११/२०११ रोजी रात्री ०९.०० ते दिनांक १५/११/२०११ रोजी सकाळी ०७.०० वाजण्याच्या सुमारास मौजे बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे येथील बावडा–वालचदंनगर रोडजवळील कै. शहजीराव पाटील कॉम्प्लेक्स पश्चिमेस असणारे ग्रामपंचायत गाळ्यातील फिर्यादीचे जनता सुपर मार्केट या नावाच्या किराणा मालाचे दुकानाचे लोखंडी शटर आरोपीने उचकटून सुर्यास्तानंतर व सुर्योदयपूर्वी गृह अतिक्रमण किंवा घरफोडी करुन दुकानातील किंमती ऐवज चोरी करण्याच्या उद्देशाने केला म्हणून त्याने भारतीय दंड संहितेचे कलम ४५७ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नाही.** |
| २. | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीच्या दुकानातून ड्रॉवरमधील नगद रक्कम रु.२५,०००/–, एक सोनी कंपनीचा सी.डी. प्लेअर अंदाजे किंमत रु.१,०००/–, एक एल.जी. कंपनीचा डि.व्ही.डी. रायटर अंदाजे किंमत रु.५००/–, तेलाच्या बाटल्या अंदाजे किंमत रु.१,०००/–, एक नोकीया कंपनीचा मोबाईल अंदाजे किंमत रु.१,०००/– तसेच दोन पामोलिन तेलाचे डबे अंदाजे किंमत रु.१४,००/– असे एकूण रक्कम रु.२९,९००/– चा मुद्देमाल फिर्यादीचे संमतविना मुद्दाम लबाडीचे इराद्याने घरफोडी करुन चोरुन नेला म्हणून त्याने भारतीय दंड संहितेचे कलम ३८० अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नाही.** |
| ३. | काय आदेश? | **आरोपी दोषमुक्त** |

## !! का र ण मी मां सा !!

८. सरकार पक्षाने आपले म्हणणे सिध्द करण्यासाठी वर नमूद केल्याप्रमाणे एकूण ३ साक्षीदारांना तपासले. त्याउलट आरोपींतर्फे कुठलाही शाब्दीक व कागदोपत्री पुरावा दाखल

करण्यात आला नाही.

**<u>मुद्दे क्रमांक १ व २ बाबत:</u>**

**९.** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ तथा फिर्यादी नवनाथ शिवाजीराव पवार याने आपल्या पुराव्यात असे कथन केले आहे की, त्याचे सन २०११ मध्ये किराणा दुकानाचा व्यवसाय होता. त्याचे दुकानाचे नांव जनता सुपर मार्केट, बावडा असे होते. घटना ही अंदाजे १४ वर्षापूर्वी घडलेली आहे. दिनांक १४ तारखेला तो त्याचे किराणा दुकान बंद करुन रात्री ०९.०० वाजण्याच्या सुमारास घरी गेला. त्यानंतर दुस–या दिवशी सकाळी ०७.००वाजण्याचया सुमारास तो दुकान उघडण्यास आला असता दुकानाचे एक शटर उघडा असल्याचे दिसून आले. त्यावेळी त्याचा सासरा शिवाजीराव भिमराव फडतरे, तसेच नातेवाईक लखन शिवाजी भोसले व फिर्यादी असे त्यांनी दुकानात जावून पाहिले असता दुकानात चोरी झाल्याचे दिसून आले. सदर चोरीमध्ये रोख रक्कम रु.२५,०००/–, खोबरे तेलाच्या बाटल्या तसेच काही किराणा वस्तु तसेच एक नोकीया कंपनीचा मोबाईल, एक सोनी कंपनीचा सी.डी. प्लेअर, एक डि.व्ही.डी. प्लेअर असे चोरी झाल्याचे दिसून आले. त्यानंतर फिर्यादीने बावडा पोलीस दुरक्षेत्र येथे जावून घटनेची खबर दिली. फिर्यादीस निशाणी क्र.२७ वरील फिर्यादी जबाब व निशाणी क्र.२८ वरील पुरवणी जबाब दाखविले असता त्याने त्यावरील त्याची सही व त्यातील मजकूर मान्य केले. त्यानंतर पोलीस फिर्यादीच्या दुकानात आले व त्यांनी फिर्यादीचा जबाब नोंदविले. त्यावेळी फिर्यादी हा पोलीसांना घटनास्थळाचे ठिकाण दाखविले. त्यानंतर पोलीसांनी त्याचे समक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केले.

**१०.** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ लखन शिवाजी भोसले हा घटनास्थळ पंच साक्षीदार असून त्याने आपल्या पुराव्याच्या सरतपासात असे कथन केले की, त्याचे ओम मोबाईल नावाचे दुकान हे बावडा येथील जनता सुपर मार्केट दुकानाच्या शेजारी आहे. दिनांक १६/११/२०११ रोजी त्याला पोलीसांनी पंचनाम्यासाठी जनता सुपर मार्केट येथे बोलाविले होते. पोलीसांनी त्याचे समक्ष जनता सुपर मार्केट दुकानात निरीक्षण करुन पंचनामा तयार केले. त्यावेळी पोलीसांनी त्याला दुकानातील वस्तुंच्या चोरीबाबत विचारले व त्याने त्यांना सांगितले. त्यानंतर पंचनाम्यावर पोलीसांनी त्याला सही करण्यास सांगितले. त्यानंतर त्याने त्यावर सही केली. सदर साक्षीदारास निशाणी क्र.३१ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविले असता त्याने

पंचनाम्यातील अनुक्रमांक ०१ वरील सही त्याने व त्यातील मजकूर मान्य केले. घटना ही दिनांक १५/११/२०११ रोजी घडली होती. तो सकाळी ०८.३० वाजण्याच्या सुमारास त्याचे दुकान उघडले होते. त्यावेळी जनता सुपर मार्केटसमोर गर्दी होती. सदरचे दुकान फोडले होते. तो सदर दुकानात गेला होता. त्याठिकाणी तेलाचे डबे, डि.व्ही.डी. प्लेअर, मोबाईल तसेच रोख रक्कम असे दुकानातून चोरीला गेले होते. पोलीसांनी सदर साक्षीदाराकडे चोरीबाबत चौकशी करुन त्याचा जबाब नोंदविला. सदरचे दुकान हे नवनाथ शिवाजी पवार यांचे आहे.

**११.** साक्षीदार क्र.३ विजय जगन्नाथ जाधव हा पंच साक्षीदार असून त्याने आपल्या पुराव्याच्या सरतपासात असे कथन केले की, तो आरोपीस ओळखत नाही. दिनांक ०७/१२/२०११ रोजी पोलीसांनी त्याला पोलीस चौकी येथे बोलावले होते. पोलीसांनी पोलीस चौकीत त्याचे सह्या घेतले. त्याच्या समक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आले नाही. तसेच त्याच्या समक्ष कोणतेही डबे जप्त करण्यात आले नाहीत. सदर साक्षीदारास दिनांक ०७/१२/२०११ रोजीचा निवेदन पंचनामा तसेच जप्ती पंचनामा दाखविले असता त्याने त्यावरील अनुक्रमांक ०१ वरील सही मान्य करुन त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दाखविली.

**१२.** सदर प्रकरणात आरोपीविरुद्ध दोषारोप सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाने हे सिद्ध करणे आवश्यक आहे की, आरोपीने फिर्यादीच्या दुकानात घरात गृह अतिक्रमण सुर्यास्तानंतर व सुर्योदयपूर्वी गृह अतिक्रमण घरफोडी करुन चोरी करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या ताब्यातील रक्कम रुपये २९,९००/– किंमतीच्या मुद्देमालाची अप्रामाणिक हेतुने चोरी केला, हे अभियोग पक्षाने आरोपींविरुद्ध संशयापलीकडे जावुन सिद्ध केले पाहिजे व तशी सर्वस्वी जबाबदारी अभियोगपक्षाच्या खांदयावर असते.

**१३.** अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे विवेचन करण्यापुर्वी हे नमुद करणे आवश्यक आहे की, सदर प्रकरणात अभियोगपक्षाने न्यायालयात तपासलेले एकुण तीन साक्षीदार असून सा.क्र.१ हा फिर्यादी असून त्याचा मित्र साक्षीदार क्र.२ घटनास्थळ पंच साक्षीदार आहे. तसेच साक्षीदार क्र.३ हा निवेदन तथा जप्ती पंच साक्षीदार आहे. परंतू साक्षीदार क्र. ३ यांनी अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. सदर घटनेचा कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याचे पटलावर आलेले नाही.

**१४.** अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपीने घटनेच्या वेळी फिर्यादीच्या दुकानात घरफोडी करुन चोरी करण्याच्या उद्देशाने सुर्यास्त व सुर्योदय दरम्यान गृह अतिक्रमण करुन फिर्यादीच्या ताब्यातील नगद रक्कम रुपये रु.२५०००/– तसेच इतर साहित्य अंदाजे किंमत रु.४,९००/– चा मुद्देमाल चोरुन नेल्याचे आहे. त्याकरीता याठिकाणी पटलावर दाखल असलेल्या साक्षीपुराव्याचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. फिर्यादी हा घटनेचा ऐकीव साक्षीदार असून त्याचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त नाही. कारण त्याने उलटतपासात असे मान्य केले की, त्याच्या दुकानातून चोरी करणारे नेमके कोणते इसम होते ते आजतागायत त्याला माहित नाहीत. तसेच फिर्यादीने त्याच्या उलटतपासात पुढे असे मान्य केले की, त्याला घटनेबाबत व्यक्तीशः माहित नाही, त्याच्या दुकानात चोरी कोणी केली होती हे त्याला माहित नाही. पोलीसांनी त्याच्या समक्ष आरोपीची ओळख परेड घेतली नाही. तसेच पोलीसांनी त्याला चोरी करणा–या कोणत्याही व्यक्तीचे नाव सांगितले नाही. सबब फिर्यादीचे सदर कथनावरुन त्याने प्रस्तुत खटल्यातील आरोपीच्या विरुध्द कोणतेही कथन केले नाही. याउलट, त्याला त्याच्या दुकानातून चोरी करणारा व्यक्ती कोण आहे हे आजतागायत त्याला माहित नसल्याचे त्याने मान्य केले. सबब फिर्यादीचा पुरावा पाहता अभियोग पक्षाच्या हकीकतीस उपयुक्त वाटत नाही.

**१५.** साक्षीदार क्र. २ लखन शिवाजी भोसले हा घटनास्थळ पंच असून तो फिर्यादीच्या घराजवळ राहतो. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, दिनांक १६/११/२०११ रोजी त्याला पोलीसांनी पंचनाम्यासाठी जनात सुपर मार्केट येथे बोलाविले होते. पोलीसांनी त्याचे समक्ष जनात सुपर मार्केट दुकानात निरीक्षण करुन पंचनामा तयार केले. त्यावेळी पोलीसांनी त्याला दुकानातील वस्तुंच्या चोरीबाबत विचारले व त्याने त्यांना सांगितले. त्यानंतर पंचनाम्यावर पोलीसांनी त्याला सही करण्यास सांगितले. त्यानंतर त्याने त्यावर सही केली. परंतू याठिकाणी असे नमूद करणे आवश्यक आहे की, सदर पंच साक्षीदार व पोलीस कर्मचारी यांना घटनास्थळाचे ठिकाण कोणी दाखविले, त्यानंतर पोलीस कर्मचारी यांनी सदर साक्षीदाराच्या समक्ष काय कार्यवाही केली याबाबत तसेच घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र. ३१ मधील नमूद कथनांबाबत कोणतेही कथन सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात केले नाही. निशाणी क्र.३१ वरील घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता सदर फिर्यादीच्या दुकानाच्या अवती–भोवती व दुकानात निरीक्षण करुन पंचनामा करण्यात आलेला आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या समक्ष केवळ पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळ पंचनामा करुन सदर

साक्षीदारास त्यावर सही करण्यास सांगितले. परंतू घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर हा पोलीसांनी कोणाच्या सांगणेवरुन पंचनाम्यात नमूद केले याबाबत सुध्द सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात कोणतेही कथन केले नाही. दुसरा पंच नामे फिरोज गुलाब शेख व तपासीक अधिकारी यांची साक्ष पटलावर दाखल नाही. सदर साक्षीदाराचा पुरावा पाहता घटनास्थळ पंचनाम्यास महत्व राहत नाही. सबब घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र.३१ शाबीत झाले नाही.

१६. तसेच साक्षीदार क्र.२ लखन भोसले याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, त्याचेकडे पोलीसांनी घटनेबाबत चौकशी करुन त्याचा जबाब नोंदविला होता. परंतू याठिकाणी असे नमूद करणे आवश्यक आहे की, सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात कोठेही प्रस्तुत खटल्यातील आरोपी विरुध्द कथन केले नाही. तसेच प्रस्तुत खटल्यातील आरोपीने फिर्यादीच्या दुकानातून चोरी केली होती याबाबत त्याला आरोपी हा अटकेत असतांना पोलीसांनी त्याला सांगितले होते असे सुध्दा त्याने त्याच्या पुराव्यात कथन केले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षाच्या हकीकतीस पुरक नाही.

१७. साक्षीदार क्र.३ विजय जगन्नाथ जाधव हा निवेदन तथा जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असून त्याने केवळ पंचनाम्यावरील त्याची सही मान्य करुन मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. करीता सदर साक्षीदारास अभियोग पक्षातर्फे फितुर घोषीत करुन त्याची कसुन उलटतपासणी घेण्यात आली. परंतू त्यात सुध्दा अभियोग पक्षास आरोपीच्या विरुध्द काहीही निष्पन्न झाले नाही. तसेच दुसरा पंच नामे गोरख तानाजी गायकवाड व तपासीक अधिकारी यांची साक्ष पटलावर दाखल नाही. सबब निवेदन व जप्ती पंचनामा शाबीत झाले नाही.

१८. प्रस्तुत खटल्याचे अभिलेखाचे अवलोकन केले असता उर्वरित साक्षीदार तसेच तपासीक अधिकारी यांना साक्षी समन्स व अधिपत्रे जारी करण्यात आले. पोलीस कर्मचारी यांनी अहवालासह तपासीक अधिकारी यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले. परंतू अभियोग पक्षास पुरेशी संधी देवून सुध्दा उर्वरित साक्षीदारांची साक्ष पटलावर दाखल करण्यास अपयशी ठरले. सबब अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ ते ३ यांचा पुरावा अभियोग पक्षाच्या कथनास पुष्टी देत नाही. याउलट, साक्षीदारांचा पुरावा हा संदीग्ध स्वरुपाचा वाटतो. तसेच सदर साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपीने फिर्यादीच्या दुकानात घटनेच्या वेळी अवैद्यरितीने प्रवेश करुन नगद व इतर साहित्यांची चोरी असा कोणताही सबळ व भक्कम पुरावा दिसून येत नाही.

**१९.** अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरुन कोणत्याही आरोपींकडून मुद्देमालाची जप्ती कायदयाप्रमाणे सिद्ध झाली नाही. वरील नमुद गुन्हयांचा कोणताही प्रत्यक्ष साक्षीदार अभियोगपक्षाने न्यायालयात हजर केला नाही. शिवाय फिर्यादीने सदर प्रकरणातील आरोपीच्या विरुध्द त्याच्या वस्तुंच्या चोरीबाबत कोणतेही कथन केले नाही. या सर्व बाबी पाहता अभियोगपक्षाच्या पुराव्यावर संशय निर्माण होतो व कायदयाचे तत्व असे आहे की जेव्हा अभियोगपक्षाच्या पुराव्यावर संशय निर्माण होतो तेव्हा त्याचा फायदा आरोपी पक्षास दिला जातो.

**२०.** वर नमुद केल्याप्रमाणे सदर प्रकरणात आरोपींविरुद्ध काही प्रमाणात पुरावा पटलावर आलेला आहे. परंतु अभियोगपक्षाने आरोपीविरुद्ध कोणताही सबळ व भक्कम असा पुरावा न्यायालयात दाखल केला नाही. त्यामुळे आरोपींविरुद्ध दोषारोपीत गुन्हे की, आरोपीने फिर्यादीच्या दुकानात सुर्यास्तानंतर व सुर्योदयपूर्वी गृह अतिक्रमण घरफोडी करुन चोरी अंदाजे किंमत रक्कम रु.२९,९००/- च्या मुद्देमालाची अप्रामाणिक हेतुने चोरी केला, हे गुन्हे संशयापलीकडे जावुन अभियोगपक्ष आरोपींविरुद्ध सिद्ध करण्यास असमर्थ ठरलेले आहे. त्यामुळे मी मुद्दे क्र.१ व २ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे व मुद्‌दा क्र.३ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश परीत करीत आहे.

## – आ दे श –

१. आरोपी अनिल किसन वाघमोडे यास फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधानाचे कलम ४५७ व ३८० सह कलम ३४ अंतर्गत दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. पोलीस निरीक्षक, इंदापूर यांना आदेशीत करण्यात येते की, प्रस्तुत गुन्हयातील जप्त मुद्देमाल दोन पत्र्याचे चौकानी डबे त्यापैकी एक डब्यात चार किलो पामोलिव्ह तेल व दुसरा रिकामा डबा हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावे.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये पुर्तता करणेकामी त्याचे स्वबंधपत्र रूपये १५,०००/– रुपये इतके दिले.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI
Date: 2026.06.29 13:15:44 +0530

(**एम. एच. फारुकी**)
दिनांक: २९/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
इंदापूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | Smt. P. D. Kadam<br>(Stenographer-3) |
| Court Name | :- | Shri. M.H. Farooqui,<br>Judicial Magistrate First Class,<br>Indapur ,Tal. Indapur, Dist. Pune. |
| Date | :- | 29.06.2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 29.06.2026 |
| Order uploaded on | :- | 29.06.2026 |